**मान्यवर मित्र हो,**

नांदेड येथील ८६ व्या.अ.भा.मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारतांना मी पुरेसा संकोचलो आहे. नाटक आणि रंगभूमी या संदर्भातला हा सर्वोच्च बहुमान आहे, असे मराठी माणूस मानत आला आहे. आणि असा हा बहुमान मिळावा, एवढे कोणतेही ऐतिहासिक कर्तृत्व माझ्या हातून घडलेले नाही. मागील ८५ अध्यक्षांची नावे वाचली, त्यांचे नाटक या क्षेत्रातले कर्तृत्व लक्षात घेतले; तेव्हा एक गोष्ट माझ्या लक्षात आली, मराठी नाटक आणि रंगभूमी यावर आस्थेने केवळ प्रेम करणाऱ्या काही व्यक्तींनाही अध्यक्षपद देण्याचे औदार्य मराठी नाट्यपरिषदेने दाखवले आहे. नाट्यपरिषदेच्या या औदार्यामुळे अध्यक्षपद स्वीकारण्याइतका दिलासा मला मिळाला. त्यामुळे नाट्यपरिषदेचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

नाट्यसंमेलनाचा इतिहास चाळल्यानंतर आणखीही एक गोष्ट माझ्या लक्षात आली. समीक्षक मानोत अगर न मानोत, कै.राम गणेश गडकरी हे स्वातंत्र्यपूर्व काळातले एक अतिशय महत्वाचे नाटककार आहेत. त्यांच्या हयातीत पुणे येथे दोन वेळेला नाट्यसंमेलन झाले. त्यांच्याच हयातीत पुणे येथे एकाच व्यक्तीला दोन वेळेला संमेलनाध्यक्षपद मिळाले. पण त्यांना मात्र संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले नाही. म्हणून इतिहासातल्या आणि वर्तमानातल्या अशा व्यक्ती ज्यांचा संमेलनाध्यक्ष म्हणून गौरव व्हावा असे मला स्वत:लाच वाटते, त्यांना अभिवादन करुन मी हे पद स्वीकारत आहे.

नाट्यसंमेलनाच्या इतिहासात मराठवाड्यात नाट्यसंमेलन झाले ते प्रथम नांदेड येथे, त्यानंतर परभणी येथे आणि आता नांदेडला. त्यामुळे मराठवाड्यातल्या नाट्य रसिकांना माझ्या निवडीचा विशेष आनंद झाला आहे. खरे तर माझ्याही आधी माझ्यापेक्षा अधिक कर्तृत्व असणाऱ्या मराठवाड्यातल्या व्यक्तींना हा सन्मान मिळायला हवा होता. औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगावच्या कै.लोटू पाटील यांची नाट्यक्षेत्रातली कामगिरी लक्षात घेतली तर आपणास थक्क व्हायला होते. त्यांनी स्थापन केलेल्या श्रीराम संगीत मंडळीचा शताब्दी महोत्सव नुकताच साजरा झाला. या प्रसंगी सुप्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक श्री.जब्बार पटेल आणि प्रसिद्ध नाट्यकलावंत